श्री. दाते दिपक ज्ञानदेव, कंत्राटी ग्रामसेवक
(सध्या पदनाम - ग्रामपंचायत अधिकारी) यांना
ग्रामपंचायत अधिकारी पदावर नियमित करणे बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जि.प.आदेश क्रमांक.साप्रवि-२/ग्रापं-१/५६१/२०२६
दिनांक:-स्वाक्षरीखाली नमूदप्रमाणे

वाचा:- १.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( सेवाप्रवेश ) नियम १९६७

२.महा.शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई कडील शासन निर्णय क्र.एपिटी-१०००/प्रक्र २७२/१३ दिनांक ६ जुन २००१

३. महा.शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई कडील शासन निर्णय क्र.एपिटी-२००५/प्रक्र २७२/आस्था-८ दिनांक २० एप्रिल २००६

४. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२३/प्र.क्र.८६/आस्था७, दि.१८ जुलै २०२३.

५. कार्यालयीन नियुक्ती आदेश जा.क्र.साप्रवि-२/ग्राप-१/१४१९/४५९/२०२३ दि.१४/०८/२०२३

६.गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर यांचेकडील प्रस्ताव जा.क्र.कावि/आस्था-२/१००३/२०२६ दिनांक ३१/०८/२०२६

खालील नमुद उमेदवाराला कंत्राटी ग्रामसेवक (सध्या पदनाम - ग्रामपंचायत अधिकारी) या पदावर संदर्भ क्रमांक ४ च्या आदेशान्वये नियुक्ती देण्यात आली असुन सदर कंत्राटी ग्रामसेवक (सध्या पदनाम - ग्रामपंचायत अधिकारी) यांनी त्यांचा ३ वर्षाचा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्याचा अहवाल गट विकास अधिकारी,पं.स. पारनेर यांनी संदर्भ क्र.६ अन्वये सादर केला असुन त्यांना सेवेत नियमित करण्याची शिफारस केलेली आहे.

महा.शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई कडील शासन निर्णय क्र.एपिटी-१०००/प्रक्र २७२/१३ दिनांक ६ जुन २००१ मधील तरतुदीनुसार, मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर खालील कंत्राटी ग्रामसेवकाचे (सध्या पदनाम - ग्रामपंचायत अधिकारी) ३ वर्षे काम समाधानकारक पुर्ण झाल्याने रूपये १६०००/- मानधनावरून त्यांची सेवा ग्रामपंचायत अधिकारी जिल्हा सेवा वर्ग-३ या पदावर सुधारीत मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-८ (२५५००-८११००) मध्ये त्यांच्या नावासमोर रकाना नं.६ मधील त्यांचा गैरहजर / रजेचा कालावधी हा कर्तव्यकाळ न धरता सदर कालावधी वगळुन ते हजर झालेल्या दिनांकापासुन नमुद कार्यरत तालुक्यात ग्रामपंचायत अधिकारी या नियमित पदावर नियुक्ती देत आहे.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव | कार्यरत कार्यालय / पंचायत समितीचे नाव | नियुक्ती प्रवर्ग | सेवेत रूजु दिनांक | तीन वर्षाच्या कालावधी तील गैरहजर / अनुपस्थिती / रजेचा कालावधी | सेवेत नियमित करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री. दाते दिपक ज्ञानदेव | पारनेर | इ.मा.व. | १८/०८/२०२३ | निरंक | १८/०८/२०२६ |

सदर नेमणुक खालील विहित केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन करण्यात येत आहे. कंत्राटी ग्रामसेवक (सध्या पदनाम - ग्रामपंचायत अधिकारी) यांचे नियुक्ती आदेशामध्ये नमुद इतर सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

१. जिल्हा परिषद सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास एक महिना पुर्व नोटिस द्यावी लागेल अथवा एक महिन्याचे मुळ वेतन जिल्हा परिषद निधीत / शासन खाती जमा करावे लागेल.

२. गट-क मधील उमेदवारास महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील नियम ८ नुसार शासनाने विहित केलेली, तसेच वेळोवेळी विहित करील अशा विभागीय परीक्षा / भाषा परीक्षा / प्रशिक्षण अर्हता विहित संधी व मुदतीमध्ये प्राप्त करणे बंधनकारक राहील. प्रचलित नियमानुसार विभागीय परीक्षा (सेवाप्रवेशोत्तर परीक्षा) चार वर्षात व तीन संधीत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे.

३. उमेदवारास वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ३१.१०.२००५ मधील सुचनांनुसार नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु राहील. तसेच भविष्य निर्वाह निधी लागु राहणार नाही. तसेच वेळोवेळी निर्गत केलेले शासनाचे आदेश/निर्णय/परिपत्रके यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

४. उमेदवाराची नियुक्ती जिल्हा पोलिस अधिक्षक यांचेकडील चारित्र्य पडताळणी अहवालाचे अधीन राहील. याबाबतचे अहवालात काही आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्यास सदरची नियुक्ती समाप्त करण्यात येईल. उमेदवाराने चारित्र्य पडताळणीचा अहवाल कार्यालय प्रमुखांना सादर करावा व कार्यालय प्रमुखांनी अहवालाची पडताळणी करून घ्यावी.

५. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक ७ जानेवारी २०१६ मध्ये नमुद केलेनुसार जिल्हा परिषदेच्या गट-क कर्मचा-यांने जिल्हा परिषदेच्या सेवेतील कोणत्याही पदावरील नियुक्तीव्दारे होणा-या अशा प्रथम सेवा प्रवेशाच्या वेळी अशा नियुक्तीच्या दिनांकापासुन ३ महिन्यांच्या कालावधीत त्यांची स्वत:ची मत्ता व दायित्वे त्याबदलची विवरण प्रपत्र-१, प्रपत्र-२ व प्रपत्र-३ या प्रपत्रामध्ये सादर करणेची दक्षता घ्यावी.

६. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक १/७/२००५ अन्वये दोन पेक्षा अधिक मुले असणा-या उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यात प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंब प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नियुक्त्यांसाठी अधिसूचनेत विहीत केलेली लहान कुटुंबाची अतिरिक्त अट लागु झालेली आहे. त्या अनुषंगानें सदर नियमातील प्रतिज्ञापत्र नमुना अ नुसार उमेदवारांकडुन प्रतिज्ञापत्र कार्यालय प्रमुखाने भरुन घ्यावे. सदर नियमानुसार, दिनांक २८/०३/२००५ नंतर ३ रे अपत्य असणा-या उमेदवारांची नियुक्ती नियमानुसार रद्द करण्यात येईल.

७. सदर आदेशाने नियुक्ती दिल्यानंतर संबंधिताचे नियुक्तीबाबत कोणी आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशीअंती त्यात तथ्य दिसुन आल्यास अगर नियुक्तीचे वेळी / नियुक्तीसाठी सादर केलेली माहिती चुकीची आढळुन आल्यास दिलेली नियुक्ती कोणत्याही टप्यावर व कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल. तरी सदर आदेशाची नोंद संबधितांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात येऊन सदर आदेशाची सत्वर अंमलबजावणी करण्यात यावी.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक 202610190602oo असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 19-10-2026 15:13:51
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१.श्री. दाते दिपक ज्ञानदेव, कंत्राटी ग्रामसेवक (सध्या पदनाम - ग्रामपंचायत अधिकारी), पं.स. पारनेर
व्दारा व प्रत – गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर

प्रत:-१. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
२. निवडनस्ती